**राज्यातील आदिवासी विभागांतर्गत स्वंयसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या प्राथमिक अनुदानित आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा म्हणून श्रेणीवाढ करणे व माध्यमिक आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरू करून श्रेणीवाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः -अआशा २०१५/प्र.क्र.१०४/का-११**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
तारीख: १० जून, २०१९

<u>वाचा :-</u>

१ )आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१५/ प्र.क्र.५०/का.७ (१) दिनांक २० जून, २०१५

२) आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१५/ प्र.क्र.५०/का.७ (१)/७०५९, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५.

३) आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१७/ प्र.क्र.६०/का.७ (१)/३६५७, दिनांक १४ मे, २०१८.

४) आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१७/ प्र.क्र.७९/का.७ (१)/३९१५, दिनांक २४ मे, २०१८.

५) आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१८/ प्र.क्र.४८/का.७ (१)/३९९९, दिनांक २९ मे, २०१८.

६) आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्र- अआशा-२०१८/ प्र.क्र.७५/का.७ (१)/५२१८, दिनांक २ ऑगस्ट, २०१८.

७) बालंकाचा सक्तीचा व मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९

८) शालेय शिक्षण विभागाचे पत्र क्रमांकःन्यायप्र-२०१३/ (३१२/२०१३)/ टिएनटि-१, दिनांक ०२/०१/२०१४ मध्ये नमुद रिट याचिका क्र ९५/२०१० मधील सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

<u>**प्रस्तावना :-**</u>

महाराष्ट्र राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने शासनाने सन १९७२-७३ पासून "आश्रमशाळा समूह" योजना सुरु केली. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा असून त्यापैकी ६४ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा व ४९२ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत त्यापैकी

माध्यमिक आश्रमशाळा संलग्न १५५ कनिष्ठ महाविद्यालये सुरु आहेत. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून प्राथमिक अनुदानित आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा म्हणून (इ.८ वी ते इ.१० वी ) श्रेणीवाढ करणे व अनुदानित माध्यमिक आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता ११ वी व १२ वी) मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत स्वंयसेवी सस्थांमार्फत चालविण्यात येणा-या दुर्गम भागातील व “ब” श्रेणीतील ६ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळांना माध्यमिक आश्रमशाळा म्हणून श्रेणीवाढ करण्यास, त्याचप्रमाणे ११ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये (कला व विज्ञान शाखा) सुरु करण्यास या आदेशान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. या बाबत अनुदानित आश्रमशाळाची नावे अनुक्रमे सोबतच्या परिशिष्ट " अ" व “क” मध्ये नमुद करण्यात आली आहेत. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून सदर ६ प्राथमिक आश्रमशाळांमध्ये इयत्ता ८ वी चा वर्ग सुरु करण्यात यावा व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता ९ वी चा वर्ग व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून इयत्ता १० वी चा वर्ग सुरु करण्यात यावा. तसेच सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून सदर ११ माध्यमिक आश्रमशाळांमध्ये इयत्ता-११ वी (कला व विज्ञान शाखा) चे वर्ग सुरु करण्यात यावेत व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता १२ वी चे वर्ग सुरु करण्यात यावेत.

२. उपरोक्त प्रमाणे दोन्हीही श्रेणीवाढ केल्यामुळे आकृतीबंधानुसार अनुज्ञेय शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी पदे व तद्नुषंगिक खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा उल्लेख अनुक्रमे सोबतच्या परिशिष्ट " ब" व " ड " मध्ये करण्यात आला आहे.

३. श्रेणीवाढीची मान्यता देण्यात आलेल्या अनुदानित आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने अशा आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल किमान ८०% असावा. तसेच त्यापैकी किमान ६०% विद्यार्थ्यांना प्रथमश्रेणी मिळणे आवश्यक राहील. सदर आश्रमशाळांमध्ये नियमानुसार प्रशिक्षित अर्हताकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती विहित पध्दतीने करण्यात यावी. माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी विषय शिकविणा-या शिक्षकांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असल्यास व त्यांच्या शैक्षणिक अर्हतेत प्रामुख्याने इंग्रजी विषयात प्रथमश्रेणी प्राप्त झाली असल्यास त्यांना नियुक्तीस प्राधान्य देण्यात यावे.

४. बालंकाचा सक्तीचा व मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंर्तगत नमुद करण्यात आलेल्या सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करणे व शिक्षणाचा स्तर उकृष्ट ठेवणे संस्थेवर

बंधनकारक राहील. तसेच उक्त संदर्भ.४ मधील दिनांक ०२/०१/२०१४ च्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या पत्रात नमूद सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी उपरोक्त बाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. उपरोक्त खर्च अनुदानित आश्रमशाळांच्या संबंधित अर्थसंकल्पिय लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व वेळोवेळी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२८१/व्यय-१४, दिनांक १४.०९.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१०१७२२०२४५२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: CN = Subrao Narayan Shinde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Tribal Development Department
Date: 2019.06.10 17:35:21 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्रः- परिशिष्ट "अ" ,"ब", " क" व “ड”**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव ,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (आ.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (आ.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन मुंबई.
८. मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

९. सर्व मा.विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे मार्फत.

१०.आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

११.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर

१२.सर्व विभागीय आयुत्त

१३.जिल्हाधिकारी, नाशिक/नंदुरबार/पालघर/गडचिरोली.

१४.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

१५.संचालक, प्राथमिक शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१६.संचालक, माध्यमिक शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१७.संचालक, उच्च शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१८. सदस्य सचिव तथा राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,जवाहर बाल भवन ,नेताजी सुभाषचंद्र मार्ग,चर्नी रोड , मुंबई-४००००४

१९.विभागीय शिक्षण संचालक, नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर

२०.संचालय, सर्व शिक्षा अभियान संचलनालय, महाराष्ट्र राज्य, चर्नीरोड, मुंबई

२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २ मुंबई/ नागपूर

२२.महालेखापाल (लेखा परीक्षा ), महाराष्ट्र - १ / २ मुंबई/ नागपूर

२३.संचालक, लेखा व कोषागरे संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२४.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/नंदुरबार/पालघर/गडचिरोली

२५.सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६.संबधित स्वयसेवी संस्था . ( परिशिष्ट “अ” व " क") प्रमाणे.

२७. निवडनस्ती (का-११)

## परिशिष्ट-अ

## आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांना सन २०१९-२० ते २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात श्रेणीवाढ (इयत्ता ८ वी ते १० वी) करावयाच्या शाळांची यादी

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शाळेचे नाव | स्वयंसेवी संस्थेचे नाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाशिक | कळवण | गुही | वनवासी कल्याण आश्रम, नाशिक | सुरगाणा | नाशिक |
| २ | | | खिर्डी | आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ, अलंगुण, ता.सुरगाणा | सुरगाणा | नाशिक |
| ३ | | नंदुरबार | गडद | आदिवासी सेवा सहाय्य व शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर, जि.नंदुरबार | नवापूर | नंदुरबार |
| ४ | ठाणे | डहाणु | मासवण | आदिवासी सेवा मंडळ, बोरीवली पूर्व, मुंबई | पालघर | पालघर |
| ५ | | | वाकी | गोखले एज्युकेशन सोसायटी विद्यानगर कॉलेज रोड, नाशिक | डहाणु | पालघर |
| ६ | | | कोचाई | आदिवासी प्रगती मंडळ, तलासरी | तलासरी | पालघर |

# परिशिष्ट ब

नव्याने मंजूर करावयाच्या अनुदानित माध्यामिक आश्रमशाळेसाठी एक आश्रमशाळानिहाय (प्रथम वर्षे) बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. (सन २०१९-२०)

रुपये

| अ. क्र. | संवर्ग | पदसंख्या | वार्षिक वेतन | परिपोषण अनुदान | आकस्मिकता १२ % & ८ % | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | माध्यमिक शिक्षक | १ | प्रथम वर्षी वेतन व अनुदान देय नाही. फक्त लाक्षणिक अनुदान प्रत्येक आश्रमशाळेसाठी रु.१०,०००/- (शा.नि.क्र.अनुआशा-१०९९/प्र.क्र.९१/ ९९/का.११ दि.२७.९.१९९९ व शासन निर्णय क्र.अनुआशा-१०९९/ प्र.क्र.९१/९९/का.११ दि.२९ मार्च, २००० अन्वये प्रथम वर्षी वेतन व अनुदान देय नाही.) | | | १०,००० |
| २. | प्रयोगशाळा परिचर | १ | | | | |
| ३. | स्वयंपाकी | १ | | | | |
| | **एकूण** | **३** | | | | |
| | ६ आश्रमशाळांसाठी एकूण खर्च | | | | | ६०,००० |

नव्याने मंजूर करावयाच्या अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेसाठी एक आश्रमशाळानिहाय (दुसरे वर्षे) बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. (सन २०२०-२१)

रुपये लाखात.

| अ. क्र. | संवर्ग | पद संख्या | मासिक वेतन | वार्षिक वेतन | परिपोषण अनुदान (इ.८ वी व ९वी ४० x २ =८०) ९००x८०x१० | आकस्मिक खर्च १२ % & ८ % | एकूण (५ + ६ + ७ ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | माध्यमिक शिक्षक | २ | १६००० (निश्चित वेतन) | १९२००० | ७.२०.००० | २३०४० | १५,३४,८९४ |
| २. | प्रयोगशाळा परिचर | १ | १७६३२ | २११५८४ | | २५३९० | |
| ३. | स्वयंपाकी | १ | १४७६७ | १७७२०४ | | १४१७६ | |
| ४. | कामाठी | १ | १३२३३ | १५८७९६ | | १२७०४ | |
| | **एकूण** | **५** | **६१६३२** | **७३९५८४** | **७.२०,०००** | **७५३१०** | **१५,३४,८९४** |
| | ६ शाळांसाठी एकूण खर्च (**६ x १५३४८९४**) | | | | | | **९२,०९,३६४** |

नव्याने मंजूर करावयाच्या अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेसाठी एक आश्रमशाळानिहाय (तीसरे वर्षे) बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. (सन २०२१-२२)

रुपये

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्या | मासिक वेतन | वार्षिक वेतन | परिपोषण अनुदान (इ.८ वी ९वी व १० वी ४० x ३ =१२०) ९००x१२०x१० | आकस्मिकता १२ % & ८ % | एकूण (५ अ ६ अ ७ ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८ |
| १. | माध्यमिक मुख्याध्यापक | १ | ४११११ | ४९३३३२ | १०,८०,००० | ५९,२०० | ३२६८६७१ |
| २. | माध्यमिक शिक्षक | ४ | ३२००० (निश्चितवेतन) | ३८४००० | | ४६,०८० | |
| ३. | कनिष्ट लिपीक | १ | १७६३२ | २११५८४ | | २५,३९० | |
| ४. | प्रयोगशाळा परिचर | १ | १७६३२ | २११५८४ | | २५,३९० | |
| ५. | शिपाई | १ | १३२३३ | १५८७९६ | | १९,०५५ | |
| ६. | स्वयंपाकी १४७६७ x २ | २ | २९५३४ | ३५४४०८ | | २८,३५२ | |
| ७. | कामाठी | १ | | १५८७९६ | | १२७०४ | |
| | **एकूण** | **११** | | १९,७२,५०० | १०,८०,००० | २,१६१७१ | ३२६८६७१ |
| | ६ शाळांसाठी एकूण खर्च (६ X ३२६८६७१) | | | | | | १,९६,१२,०२६ |
| ३. वर्षात एका आश्रमशाळेसाठी एकूण खर्च. | | | | | | **४८,१३,५६५** | लक्ष |
| ३ वर्षात एका आश्रमशाळेसाठी पदनिर्मिती | | | | | | ११ | पदे |
| ६ आश्रमशाळांसाठी एकूण पदनिर्मिती | | | | | | ६६ | पदे |
| **६ शाळांचा तीन वर्षाचा एकूण खर्च ( ६ X ४८१३५६५)** | | | | | | | **२,८८,८१,३९०** |
| **सन २०२१-२२ पासून ६ आश्रमशाळांसाठी आवर्ती खर्च** | | | | | | | **१,९६,१२,०२६** |

# परिशिष्ट-क

## आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांना सन २०१९-२० ते २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात श्रेणीवाढ (इयत्ता ११ वी ते १२ वी) (कला व विज्ञान) करावयाच्या शाळांची यादी

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प कार्यालय | शाळेचे नाव | स्वयंसेवी संस्थेचे नाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **नाशिक** | कळवण | श्रीभुवन | आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ, अलंगुण, ता.सुरगाणा, जि.नाशिक | सुरगाणा | नाशिक |
| २ | | | भेगुसावरपाडा | आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ, अलंगुण, ता.सुरगाणा, जि.नाशिक | सुरगाणा | नाशिक |
| ३ | | तळोदा | पाटलीपाडा | शिवांजली महिला समिती, नंदुरबार | नंदुरबार | नंदुरबार |
| ४ | | नंदुरबार | बिलमांजरे | आदिवासी सेवा सहायक व शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर, जि.नंदुरबार | नवापूर | नंदुरबार |
| ५ | | | वडफळी | आदिमाता बहुउद्देशिय संस्था वडफळी, ता.नवापूर, जि.नंदुरबार | नवापूर | नंदुरबार |
| ६ | **ठाणे** | जव्हार | चाबके तळावली | ज्ञानप्रबोधिनी शैक्षणिक संस्था, भवानीनगर, कल्याण, जि.ठाणे | विक्रमगड | पालघर |
| ७ | | | हिरडपाडा | गगनगिरी आदिवासी शिक्षण प्रसारक संस्था, जामसर, ता.जव्हार, जि.पालघर | जव्हार | पालघर |
| ८ | | | परळी | पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समजा उन्नती मंडळ, भिवंडी, जि.ठाणे | वाडा | पालघर |
| ९ | | डहाणु | शिगाव | जिवन विकास शिक्षण संस्था, पालघर, जि.पालघर | पालघर | पालघर |
| १० | | | साखरे | वाणगांव एज्युकेशन सोसायटी वाणगांव, ता.डहाणू, जि.पालघर | डहाणू | पालघर |
| ११ | **नागपूर** | भामरागड | उडेरा | पितृछाया बहुउद्देशिय शिक्षण संस्था, भंडारा | एटापल्ली | गडचिरोली |

# परिशिष्ट – ड

नव्याने मंजूर करावयाच्या अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांसाठी बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

रुपये .

| अ. क्र. | वर्षे/इयत्ता | संवर्ग | पद संख्या | मासिक वेतन | वेतनावरील खर्च (वार्षीक) | परिरक्षण अनुदान | आकस्मिक खर्च १२ % | एकूण (६ + ७ + ८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| १. | सन २०१९-२० इयत्ता ११ वी कला व विज्ञान | उच्च माध्य. शिक्षण सेवक | ४ | ३६००० | ४३२००० | (९००x ८० x१०) ७२०००० | २८८०० | ११८०८०० |
| २. | सन २०२०-२१ इयत्ता ११ वी व १२ कला व विज्ञान. | उच्च माध्य. शिक्षण सेवक | ८ | ७२००० | ८६४००० | (९०० x १६० x१०) १४४०००० | ५०४०० | २३५४४०० |

| | | |
|---|---|---|
| एक कनिष्ठ महाविद्यालयासाठी प्रथम वर्षाचा खर्च | ११,८०,८०० | रुपये |
| एक कनिष्ठ महाविद्यालयासाठी द्वितीय वर्षाचा एकूण खर्च | २३,५४,४०० | रुपये |
| एका कनिष्ठ महाविद्यालयासाठी २ वर्षासाठी एकूण खर्च | ३५,३५,२०० | रुपये |
| एक कनिष्ठ महाविद्यालयासाठी होणारी पदनिर्मिती | ८ | |
| कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या. | ११ | |
| ११ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी द्वितीय वर्षापासून एकूण खर्च | २,५८,९८,४०० | रुपये |